# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या १६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि.२१ ऑगस्ट, २०१७ दुपारी १२:०० वा.

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

अधिसभेची १६ वी बैठक दि.२१ ऑगस्ट, २०१७ रोजी दुपारी १२:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. गेंगजे एस. आर., प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. पुजारी डी. डी., प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य् |
| ४) | प्रा. डॉ. अशोककुमार ई. एन., प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. उबाळे व्ही. पी., प्र. सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. एम. कृष्णमूर्ती, प्र. सहयोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ७) | श्री. रोकडे एम. एस., प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ८) | डॉ. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ९) | डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. घुटे व्ही. बी., प्र. संचालक ज्ञान स्त्रोत केंद्र | सदस्य |
| ११) | श्री. शिंदे एस. एन., संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | सदस्य |
| १२) | डॉ. तोरवी एस. एस., संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळ | सदस्य |
| १३) | डॉ. वलेकर डी. एम. | सदस्य |
| १४) | प्रा. पी. प्रभाकर, प्र. कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागत:**

मा. प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार अधिसभेच्या या बैठकीस विविध विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच नवीन सदस्य यांचे मा. प्र. कुलसचिव यांनी स्वागत केले.

अनुपस्थिती :

डॉ. डी. आर. नंदनवार प्र. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), मा. शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण) यांनी व डॉ. श्रीमती ए. एम. रंगरेज, प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांनी दूरध्वनीद्वारे या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून त्यास मान्यता देण्यात आली.

प्रभारी कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना पंधराव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- कुलसचिव कार्यालय:
  १) प्रस्तुत विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी व अभ्यांगत यांच्या सोयीसाठी राष्ट्रीयकृत बँकेची शाखा व ए.टी.एम. सुरु करण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून यशोचित कार्यवाही सुरु आहे.
  २) शै. वर्ष २०१६-१७ साठी १० महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीवर नियुक्त करण्यात आलेल्या एकूण ३९ शिक्षकांना दि. ३०/०४/२०१७ रोजी सेवामुक्त करण्यात आले.
  ३) विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाकडून अतिरिक्त कार्यभार माहिती मागविण्यात येवून त्यानुसार एकूण ३६ शिक्षकीय पदे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार दि. २२/०६/२०१७ रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली. सदर पदांची मुलाखत दि. ०५/०७/२०१७ व ०६/०७/२०१७ रोजी घेण्यात येवून निवड समितीने शिफारस केलेल्या एकूण ३५ उमेदवारांना नियुक्ती आदेश पारित करण्यात आलेले आहे. सदर नियुक्ती आदेशाच्या अनुषंगाने आजतागायत विद्यापीठाच्या विविध संकुलात ३१ कंत्राटी शिक्षक रुजु झाले आहेत.
  ४) सोलापूर विद्यापीठात इतर अकृषी विद्यापीठाप्रमाणे अनुदानित तत्त्वावर मराठी, हिंदी व इंग्रजी असे एकूण ३ पदव्युत्तर भाषा विभाग सुरु करुन शिक्षकीय पदे निर्माण करण्याबाबत दि. ०८/०५/२०१७ रोजी मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग,

सोलापूर, मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या शिफारशीसह प्रस्ताव मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव मंजूर होण्यासंदर्भात शासन दरबारी पाठपुरावा सुरु आहे.

५) प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील वाढता कार्यभार, CBCS प्रणाली लागू केल्याने Elective व Core विषयांचा अध्यापनाचा व्याप वाढल्यामुळे नियमित शिक्षकांचे उर्वरित ५ पदे भरण्यासंदर्भात सर्वकष प्रस्ताव तयार करुन मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयात दि. २३/०५/२०१७ रोजी हस्तपोच सादर करण्यात आले आहेत. दि. २५/०५/२०१७ मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहे.

६) प्रस्तुत विद्यापीठातील कुलसचिव पद रिक्त झाल्याने सदर पदाची जाहिरात विविध वर्तमानपत्रात तसेच महाराष्ट्र शासनाच्या व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पुनश्च: प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण ९ अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले असून त्याची दि. ०८/०५/२०१७ रोजी छाननी समितीमार्फत छाननी करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

७) प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक साक्षरता (Financial Literacy) या विषयावर श्री. टी.एन. शिंधी यांचे व्याख्यान अयोजित करण्यात आले होते.

८) महाराष्ट्र तत्वज्ञान परिषद व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्मृतीशेष प्राचार्य शिवाजीराव भोसले व्याख्यानमाला, मा. डॉ. प्रकाश पवार, विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे “भारतीय लोकशाही पुढील आव्हाने” या विषयावर व्याख्यान यशस्वीरित्या पार पाडण्यात आले.

९) सर्व विद्याशाखेतील पदवीच्या द्वितीय वर्षाचे सर्व अभ्यासक्रम हे निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) नुसार तयार करण्यात आलेले अभ्यासक्रम सर्व संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रकान्वये कळविण्यात आले असून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

१०) विविध संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील संकुलाकडून अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता अनुदान मंजूर केलेल्या प्रस्तावांची बीले मान्यता घेवून वित्त व लेखा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.

११) महाराष्ट्र शासनाच्या दि. २३ फेब्रुवारी, २०१७ रोजीचे राजपत्र ३८ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ दि. ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आणण्याचे निश्चित केले असल्याने मा. कुलगुरुमहोदयांनी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (Faculty of Science & Technology) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (Faculty of Commerce & Management) मानवविज्ञान विद्याशाखा (Faculty of Humanities) आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा (Faculty of Interdisciplinary Studies) अशा एकूण ४ विद्याशाखेसाठी ४ प्रभारी अधिष्ठातांची व २ सहायक अधिष्ठातांची नेमणूक

करण्यात आलेली असून संबंधितांना तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठातील संकुलांना देखील कळविण्यात आलेले आहे.

१२) राजर्षी शाहू महाराज पुरस्कारासाठी सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुले यांच्याकडून विद्यार्थ्यांची नावे मागविण्यासाठी परिपत्रक पाठविण्यात आले आहे.

१३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार अभ्यासमंडळ प्राधिकरणाच्या निवडणूकीसाठी विविध विषयाच्या विभागप्रमुखांची मतदार यादी विषयानुसार तयार करुन सभा व निवडणूक विभागास सादर करण्यात आली आहे.

१४) B. Pharm/M. Pharm या विषयाचा अभ्यासक्रम Pharmacy Council of India यांनी त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिल्याप्रमाणे शै. वर्ष २०१७-१८ पासून लागू करण्याची कार्यवाही सुरु असून Pharmacy Council of India ला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

१५) सर्व विद्याशाखेतील पदवी वर्गाच्या तृतीय वर्षाचे सर्व अभ्यासक्रम हे निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) नुसार तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

१६) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या दि. २ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास शै. वर्ष २०१७-१८ पासून लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयाचा समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.

१७) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या दि. १९ जून, २०१७ रोजीच्या पत्रानुसार सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षास असणाऱ्या पर्यावरणशास्त्र या विषयाचा अद्ययावत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून लागू करण्यात येणार आहे.

१८) शै. वर्ष २०१७-१८ साठी सेमिनार/वर्कशॉप संदर्भात संलग्नित महाविद्यालये व संकुले यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यासंदर्भात परिपत्रक पाठवून दि. ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

१९) राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशीनुसार महाविद्यालयीन स्तरावरील अंतर्गत मूल्यमापनामध्ये Open Book Examination व Take Home Examination चा समावेश करण्याचे ठरले असून सदर बाब महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळविण्याची कार्यवाही सुरु आहे.

२०) CGPA/CBCS नुसार Merit List व Gold Medal List तयार करण्याकरिता नियमावली तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

२१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ०४ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुतीर्ण होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये एकूण गुणांच्या ३% गुणांची सवलत देण्याबाबतची शासनाकडून तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार परीक्षा विभागाने कार्यवाही करण्याचे ठरले.

२२) विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटी विभागात जमा करण्यासाठी देण्यात आलेल्या मुदतीनुसार १५ फेब्रुवारी, २०१७ पूर्वी जमा करण्यात आलेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या पात्रता अर्जातील त्रुटी तपासून ऑनलाईन प्रणालीद्वारे अंतिम पात्रता करण्यात आली

आहे. अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, विधी, एम.बी.ए. या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रिया मार्फत होतात. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या उशीरा प्राप्त झाल्यामुळे अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, विधी व एम.बी.ए. या अभ्यासक्रमांच्या डी.टी.ई. मार्फत आलेल्या याद्या तपासून ऑनलाईन प्रणालीद्वारे पात्रता करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

२३) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ करिता प्रवेशित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, एम.ए. (सर्व विषय), एम.कॉम., एम.एस्सी. (सर्व विषय) एम.सी.ए., पी.जी.डी.सी.ए., डी.बी.एम., एम.एस.डब्ल्यू., एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटीं संबंधित महाविद्यालयांना व विद्यापीठातील संकुलांना दि. ३१/१२/२०१५ ते १५/०१/२०१७ पूर्वी ऑनलाईन कळविण्यात आल्या होत्या. परंतु सदरील मुदतीनंतर त्रुटींची पूर्तता केलेल्या व पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची रु. ५००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारणी करुन पात्रता कायम करण्यात येत आहे.

२४) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ते २०१६-१७ मध्ये पीएच.डी. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करुन ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागद पत्रांची पूर्तता केली नही, अशा विद्यार्थ्यांच्या नावांची यादी तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या देखील संबंधित महाविद्यालयांना आणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) यांना कळविण्यात आली आहे.

२५) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी. (Entrepreneurship), बी.एस्सी. (BioTech), एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एल.एल.एम., एम.एस.डब्ल्यू., पी.जी.डी.सी.ए., डी.बी.एम., बी.बी.ए., बी.एस्सी (ECS) अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष), वास्तुकलाशास्त्र, एम.बी.ए., एम.सी.ए. (प्रथम व द्वितीय वर्ष) या अभ्यासक्रमाचे पात्रता अर्जासंदर्भातील नियम, पात्रता शुल्क व पात्रता अर्ज स्विकारण्याच्या तारखा निश्चित करुन याबाबतचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

२६) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता Directorate of Technical Education, Maharashtra State, Mumbai यांच्या कडून अभियांत्रिकी औषणनिर्माणशास्त्र (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष) वास्तुकलाशास्त्र, एम.बी.ए., एम.सी.ए. (प्रथम व थेट द्वितीय वर्ष) या अभ्यासक्रमांच्या Cut off Date जाहीर करण्यात आल्या आहेत. या Cut off Date नंतर प्रस्तुत विद्यापीठामध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या पात्रता अर्ज व शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा जहीर करण्यासंबंधिचे परिपत्रक तयार करण्याचे काम विभागात सुरु आहे.

२७) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता ई-सुविधा योजने अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश व ई-सुविधा शुल्काबाबतचे परिपत्रक तयार करुन विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

२८) शैक्षणिक वर्ष २०१३-१४-१५ करिता संबंधित महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र जमा करण्याबाबत १०० रुपयाच्या स्टँप पेपरवर हमीपत्र घेवून त्या अनुषंगाने निकाल जाहिर करण्याबाबत परीक्षा विभागास कळविण्यात आले होते, परंतु आजमितीस यातील काही विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र जमा केलेले नाही. (ज्या विद्यार्थ्यांचे १०० रु. स्टँप पेपरवर हमीपत्र घेवून तात्पुरत्या स्वरुपात पात्र करण्यात आले होते) अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी ऑफलाईन पध्दतीने तयार करुन निकाल राखून ठेवण्याकरिता विद्यार्थ्यांची यादी परीक्षा विभागाने तोंडी मागणी केली होती. त्यानुसार परीक्षा विभागास शैक्षणिक वर्ष २०१२-१३, २०१३-१४ ते २०१४-१५ या वर्षातील पात्रता अपूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या याद्या परीक्षा विभागास पाठविण्यात आल्या आहेत.

२९) तसेच अहवाल कालावधीमध्ये विभागात येणारी विद्यार्थ्यांचे पत्रे, महाविद्यालयांनी केलेला पत्र व्यवहार, अंतर्गत कार्यालयीन टिपणी, विविध विभागांनी मागविलेली माहिती इ. सर्व विषयांवर प्राथमिकतेनुसार तातडीची कार्यवाही करण्यात येत आहे.

३०) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता इतर विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठात द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयांकडून प्रस्ताव सादर करावा लागतो. संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावावर देखील संबंधित विद्याशाखांच्या मा. अधिष्ठातांचा अभिप्राय घेण्यात येवून अशा सर्व प्रकरणांवर अंतिम कार्यवाही करण्यात येत आहे.

३१) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यापीठातील विविध संकुल/अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी प्रवेश समिती गठीत करण्यात आली होती. सदर प्रवेश समितीच्या बैठकीतील ठरावानुसार प्रवेश पूर्व परीक्षा दि. ०५ जून, २०१७ ते ०७ मे, २०१७ या दरम्यान सोलापूर, पंढरपूर, बार्शी, कोल्हापूर व सातारा या केंद्रावर घेण्यात आली असून एकूण २४३५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. त्याप्रमाणे दि. २० व २१ जून, २०१७ एम.ए., एम.कॉम. या अभ्यासक्रमांची प्रवेश पूर्व परीक्षा सोलापूर, पंढरपूर, बार्शी व सोलापूर विद्यापीठ या केंद्रावर आयोजित करण्यात आली होती. परीक्षेसाठी एकूण १०९३ विद्यार्थ्यांनी प्रवेश पूर्व परीक्षा दिली असून सदर विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय फेरीद्वारे प्रवेश पूर्ण करण्यात आले असून आज अखेर विद्यापीठ संकुलातील प्रथम वर्ष करिता ३४५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून भाग-१ व २ मिळून ७०२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहे.

३२) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता संलग्नित महाविद्यालयातील बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस.सी. (ईसीएस) अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी प्रवेश समिती गठीत करण्यात आली आहे. संलग्नित महाविद्यालयातील बी.बी.ए., बी.सी.ए. व बी.एस्सी. (ईसीएस) या अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश पूर्व परीक्षेसाठी दि. ३१/०५/२०१७ ते १५/०६/२०१७ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने दि. २२/०६/२०१७ रोजी प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात आली असून सदर परीक्षेसाठी २५६८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिलेली आहे व प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात

आला आहे. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना बोलावून दि. ०४/०७/२०१७ रोजी विद्यापीठ अधिविभागामध्ये Display of First round of allotment करुन कॉलेज निहाय विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदरील अभ्यासक्रमाची पूनर्प्रवेश परीक्षा दि. २८/०७/२०१७ रोजी ८ परीक्षा केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आले असून सदर परीक्षेस एकूण ५११ विद्यार्थ्यांनी पूर्नप्रवेश परीक्षा दिली आहे. तसेच व प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

३३) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता सोलापूर शहरातील महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी तसेच बी.एस्सी. बायोटेक्नोलॉजी या अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने करण्यासाठी महाविद्यालय स्तरावरील समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि. ११/०४/२०१७ रोजी सदर गठीत समितीची बैठक आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठ संलग्नित सोलापूर शहरातील महाविद्यालयात सुरु असलेल्या बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. बायोटेक्नोलॉजी या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने करण्यात येत असून प्रवेश प्रक्रियामध्ये ऑनलाईनद्वारे अर्ज करण्यात आले होते. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता एकूण ६४९२ विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज भरण्यात आले होते. दि. ०४ जुलै ते १८ जुलै, २०१७ पर्यंत तीन प्रवेश फेरी पूर्ण करण्यात आल्या असून दि. २४ जुलै, २०१७ पासून उर्वरित रिक्त जागांवर महाविद्यालय स्तरावर प्रवेश देण्यात आले आहे.

- **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ:**

१) कौशल्य विकासकेंद्रातंर्गत सुरु असणाऱ्या ६ महिने व १ वर्षाच्या कालावधीसाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विविध नविन अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी बैठकांचे आयोजन करण्यात येत असून अभ्यासक्रम निश्चित करण्यात येत आहे. संलग्निकरणासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. त्यासाठी LIC समिती नामनिर्देशन करण्यात आली होती.

२) कौशल्य विकासकेंद्रातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील द्वितीय सत्रातील सुरू असणाऱ्या ६ महिने व १ वर्षाचे कालावधीच्या विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा माहे मे, २०१७ ला ५ विविध केंद्रावर घेण्यात आल्या आहेत. तसेच या अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे सर्व निकाल ३० दिवसात घोषित करण्यात आले आहेत व लेजर तपासून महाविद्यालय/संस्थेला देण्यात आले आहे.

३) कौशल्य विकासकेंद्रातंर्गत सुरू असणाऱ्या विविध अभ्यासक्रमासाठी नविन **प्रमाणपत्र** छपाई करण्याची प्रक्रिया सूरू आहे. प्रमाणपत्र छपाई करण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

४) कौशल्य विकासकेंद्रातर्गत सुरू असणाऱ्या ६ महिने व १ वर्षाच्या कालावधीसाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विविध नविन प्रमाणपत्र अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी बैठकांचे आयोजन केलेले होते. त्या बैठकीत विविध नविन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आले. त्यानुसार महाविद्यालय/संस्थेस तसे कळवून संलग्निकरण शुल्क आकारून मान्यता देण्यात येत आहे.

५) कौशल्य विकासकेद्रांतर्गत ६ महिने व १ वर्षाच्या कालावधीसाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विविध महाविद्यालय/संस्थेकडून नूतनीकरणसाठी/संलग्निकरणासाठी मा.कुलगुरू महोदयांनी चार सदस्यीय समिती गठीत केली होती. त्यानुसार समितीने दि. १३/०७/२०१७ व दि. १४/०७/२०१७ रोजी विविध महाविद्यालय/संस्थेस भेट देवून अहवाल सादर केला आहे. सदर अहवालास मा. कुलगुरूमहोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार संबधित महाविद्यालयास नूतनीकरणाचे व संलग्निकरणाचे पत्र पाठविण्यात आले आहे.

६) प्रस्तुत विद्यापीठातील अविष्कार संशोधन नियतकालिका vol-५, २०१६ साठी लेख तपासणी तज्ञ परिक्षकांकडे पाठविण्यात आले होते. तज्ञ परिक्षकांनी लेख तपासून परत या विभागाकडे सादर केले आहेत.

७) अविष्कार संशोधन नियतकालिका vol-५, २०१६ साठी अविष्कार नियतकालिका संपादक मंडळाची बैठक दि.१३/०७/२०१७ रोजी संपन्न झाली. बैठकीमध्ये स्वीकृती लेख छपाई करण्यास व त्यासाठी दरपत्रक मागविण्यास ठरले. त्यानूसार मा. कुलगुरूमहोदयांची मान्यता घेवून पुरवठाधारकाकडून दरपत्रके मागविण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

८) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी महाविद्यालयस्तरावरील अविष्कार संशोधन महोत्सवासाठी महाविद्यालयस्तरीय अविष्कार समन्वयकाची नेमणूक करण्यासाठी व विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालय/संस्थेकडून प्रस्ताव सादर करण्याबाबत सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेला कळविण्यात आले आहे.

९) प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या अकरा (११) प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली व या सर्व जाहिराती विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर "Employment opportunity" या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आल्या.

१०) प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील दोन (०२) शिक्षक व एका (०१) शिक्षकेत्तर कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील बिंदुनामावली नोंदवही प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली.

११) विशेष कक्ष विभागात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि. १९ मार्च, २०१७ ते ३१ जुलै, २०१७ अखेर २० मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली असून, नाव नोंदणी

केलेल्या उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर “Special cell” या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आली आहेत.

१२) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यामधून प्रतिवर्षी एका कर्मचाऱ्यास विद्यापीठ वर्धापन दिनी "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" प्रदान करण्यात येतो, त्यानुषंगाने सन २०१७ साठी गुणवंत कर्मचारी पुरस्कारासाठी इच्छुक असलेल्या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले.

१३) संलग्नित महाविद्यालयांकडून "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" साठी प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या समितीकडून छाननी करण्यात आली व समितीने केलेल्या शिफारशीनुसार सिलबंद लिफाफा मा. कुलगुरुमहोदयांकडे अंतिम निर्णयासाठी सादर करण्यात आला.

१४) विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनासाठी काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान मंजूर केले जाते. त्यानुषंगाने संलग्नित महाविद्यालयांकडून करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनास्तव काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान मागणीचे प्रस्ताव मागविण्यात आले.

१५) करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनास्तव काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान मागणीचे प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरुमहोदयांनी गठित केलेल्या समितीकडून छाननी/पडताळणी होऊन संबंधित महाविद्यालयांना काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कमेबाबत मा. कुलगुरु महोदयांकडे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

१६) शासनाने संलग्नित महाविद्यालयातील संच मान्यतेबाबत दिलेल्या सूचनेनुसार पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव प्राप्त शासन पत्र सर्व संलग्नि महाविद्यालये यांना पाठविण्यात आले, तसेच संच मान्यतेबाबत पुढील योग्य ते निर्देश प्राप्त होण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक कार्यालयास पत्र व्यवहार करण्यात आलेले आहे.

१७) विद्यापीठ अनुदान आयोगाकडील पत्रान्वये कळविल्याप्रमाणे Gazette of notification rights of person with Disabilities Act २०१६ संलग्नित महाविद्यालयांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे.

१८) छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दतीबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१६/प्र.क्र. २२८A/१६/१६-ब दि. २९ मे, २०१७ संलग्नित महाविद्यालयांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे.

१९) शासनाने वेळोवेळी दिलेले शासन निर्णय/सूचना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे.

२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे बार्टी, पुणे आणि सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून, बार्टी, पुणे यांनी

कळविल्याप्रमाणे त्यांच्याकडून २५ विद्यार्थ्यांची यादी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

२१) दि. ३१ जुलै, २०१७ रोजी बार्टी, पुणे यांच्याकडून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण देणेसाठी २५ विद्यार्थ्यांची यादी प्राप्त झाली असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.

२२) विविध विषयातील पीएच.डी अभ्यासक्रमास प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त अंतिम शोधप्रबंध महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील परीक्षकांकडे परीक्षणासाठी पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

२३) **पीएच.डी** अभ्यासक्रमास प्रवेशीत **३१** विद्यार्थ्यांची अंतिम मौखिक परीक्षा व **एम.फील** अभ्यासक्रमास प्रवेशीत ०८ विद्यार्थ्यांची अंतिम मौखिक परीक्षा घेण्यात आली असून त्यांना पदवी प्रदान करण्यासाठी मौखीक परीक्षेची संपूर्ण केस परीक्षा विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे.

२४) **संशोधन व मान्यता समितीच्या बैठका** –

a. विज्ञान विद्याशाखेच्या पाच (५) विषयाच्या,
b. सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या सहा (६) विषयाच्या,
c. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या सहा (६) विषयाच्या,
d. कला व ललितकला विद्याशाखेच्या चार (४), व
e. वाणिज्य विद्याशाखेची एक (१) अशा एकुण बावीस (२२) बैठका घेण्यात आल्या. तसेच आगामी संशोधन व मान्यता समितीच्या बैठकांच्या संभाव्य तारखांचे नियोजन करण्यात आले आहे.

२५) विज्ञान, सामाजिकशास्त्रे, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, शिक्षणशास्त्र, कला व ललितकला व वाणिज्य या विद्याशाखांच्या एकुण सहा (६) बैठका घेण्यात आल्या.

२६) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडुन ०५ जुलै, २०१६ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या एम.फील व पीएच.डी च्या नवीन नियमावलीनुसार सद्य:स्थितीत लागु असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ११ जुलै २००९ च्या नियमावलीमध्ये संबंधीत समितीकडुन दुरुस्त्या व नियमावली अद्ययावत करण्याचे काम पुर्ण झाले असून अद्ययावत नियमावली आगामी विद्यापरीषदेसमोर ठेवण्यात येणार आहे.

२७) सन २०१५ साली घेण्यात आलेल्या SUS-PET-६ ची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून SUS-PET-७ ची प्रक्रिया नव्याने सुरू करण्याचे नियोजित आहे. या करिता महाविद्यालये / संशोधन केंद्रांकडून माहिती मागविण्यात आली आहे.

२८) विविध विषयातील पीएच.डी अभ्यासक्रमास प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त मुदतवाढ, मार्गदर्शक बदली इ. विनंती अर्ज प्राप्त झालेले असून त्यावर निर्णयासाठी संशोधन व मान्यता समितीच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

२९) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडुन ०५ जुलै, २०१६ रोजी प्रकाशित सन २०१५ साली घेण्यात आलेल्या SUS-PET-६ ची प्रक्रियेबाबत प्राप्त निवेदनाच्या

अनुषंगाने चार सदस्यीय समिती गठित करण्यात येवून सदर समितीकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

३०) शैक्षणिक व प्रशासकिय मुल्यमापनाकरिता (दुसऱ्या टप्प्याच्या) शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व फार्मसी या करिताचे तपासणी सूची (फॉर्म) अद्यावत करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

३१) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता सर्व संलग्नित महाविद्यालयाकडून संलग्निकरणाच्या नुतनीकरणाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावावर स्थानिक चौकशी समितीच्या मार्फत प्राप्त झालेल्या अहवालानूसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

३२) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता अतिरिक्त तुकडी व विषय साठी मान्यता प्राप्त झालेल्या शासन निर्णयानुसार प्रथम संलग्निकरणसाठी स्थानिक चौकशी समिती नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

३३) महाराष्ट्र शासन व ए.आय.सी.टी.ई. यांचेकडून एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअंरिग ॲन्ड रिसर्च, जामगाव, ता. बार्शी या महाविद्यालयास थेट मान्यता मिळालेली आहे, त्या संदर्भातील विद्यापीठ कडून प्रथम संलग्निकरण देण्यात आलेले आहे.

३४) दि.०४/७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार जलदगतीने अतिरिक्त तुकडीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावावर छानननी समिती नियुक्ती करुन शासनास मंजुरीस्तव पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

३५) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, स्थानिक निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित महाविद्यालयास मान्यता असल्याचे कळविण्यात आले. (एकूण ६३ अध्यापकांना)

३६) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त विद्यापीठ विहित निवड समितीमार्फत प्राप्त शिफारशीनुसार ४४ शिक्षकास परिविक्षाधीन कालावधीसाठी मान्यता देण्यात आली आहे.

३७) विद्यापीठ निवड समितीमार्फत प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने ६ प्राचार्यांना मान्यता देण्यात आल्या.

३८) महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त शासन निर्णय व पत्रावर कार्यवाही करण्यात आली. (दाने पत्र)

३९) या विभागास माहिती अधिकार २००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर कार्यवाही करून संबंधितांना अर्जात नमूद माहितीबाबत कळविण्यात आले आहे. (४ अर्ज)

४०) महाविद्यालयातील रिक्त प्राचार्य पदी दोन महाविद्यालयातील सेवाजेष्ठ अध्यापकांना प्रभारी प्राचार्य पदी मान्यता दिली आहे.

४१) राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ या कार्यालयाकडून आलेल्या निर्णयावर योग्य ती कार्यवाही करून त्याबाबत संबंधितास कळविण्यात आले आहे.

४२) अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राचार्यांच्या कालावधी संदर्भात परिपत्रक काढून पाच वर्षाची अट रद्द करण्यात आल्याचे सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांना कळविण्यात आले.

४३) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व प्राचार्य यांच्या मधून उत्कृष्ट प्राचार्य व शिक्षक पुरस्कार देण्यासाठी सर्व महाविद्यालयाकडून प्रस्ताव मागविण्याबाबत परिपत्रक पाठविण्यात आले आहे.

४४) संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक पदमान्यता देण्यात आली आहे. (एक महाविद्यालय)

४५) "Seed Money for Researchers" या योजनेंतर्गत ७ संशोधकांना संशोधनासाठी रक्कम रु. ६,२०,०००/- मंजूर करण्यात आले असून पहिल्या हप्त्याची रक्कम रु. ३,१०,०००/- देण्यात आले.

४६) कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयाचे Indoor Sports चे Utilization Certificate, The Joint Secretary, Pune यांना पाठविण्यात आले.

४७) संलग्नित ११ महाविद्यालयातील एकूण २९ सहाय्यक प्राध्यापकांना स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३ मध्ये स्थाननिश्चितीकरिता मान्यता पत्र देण्यात आले.

४८) संलग्नित ७ महाविद्यालयातील एकूण १४ सहाय्यक प्राध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्याकरिता मान्यता पत्र देण्यात आले.

४९) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसऱ्या व चौथ्या सुधारणेनुसार आणि महाराष्ट्र शासन दि. ०४/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक यांच्या API मूल्यांकनाकरिता प्रोफॉरमा तयार केले असून सर्व संलग्नित महाविद्यालयास कळवून विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला.

५०) एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी या महाविद्यालयाचे २ (f) व १२ (B) चा प्रस्ताव The Secretary, New Delhi यांच्याकडे पाठविण्यात आला.

५१) यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथील डॉ. बिले व्ही. के. यांचे API मूल्यांकनाचे पत्र व प्रमाणपत्र देण्यात आले.

५२) उमा महाविद्यालय, पंढरपूर येथील प्राचार्य, डॉ. डी. एस. परिचारक यांचे सेवाखंड क्षमापनाबाबतचे पत्र देण्यात आले.

५३) दि. १९/०९/१९९१ ते २३/१०/१९९२ या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट शिक्षकांना नेट/सेट मधून सूट देण्यासंदर्भात मार्गदर्शन मिळणेबाबत अकरा शिक्षकांचे प्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे पाठविण्यात आले.

५४) श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयातील एकूण सात शिक्षकांचे स्थाननिश्चितीचा प्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे पाठविण्यात आले.

५५) ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदांचा API मूल्यांकन Proforma तयार करण्याबाबतची बैठक घेण्यात आली.

५६) श्री. करजगीकर एस. एस. (सेवानिवृत्त) यांच्या स्थाननिश्चिती प्रस्ताव पडताळणीबाबची दुसरी बैठक घेण्यात आली असून त्यांचे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चितीचे आणि सेवानिवृत्ती वेतनाबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर, मा. सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सोलापूर व श्री. करजगीकर एस. एस. (सेवानिवृत्त) यांना पत्राद्वारे कळविण्यात आले.

५७) चेंजिस-इन-स्टाफ समितीची पहिली व दुसरी बैठक घेण्यात आली असून चेंजिस-इन-स्टाफ मान्यतेची पुढील कार्यवाही चालू आहे.

➢ **नॅक/रुसा:**

१. RUSA Coordinator म्हणून प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील, पदार्थ विज्ञान संकुल यांचे नामनिर्देशन मा. कुलगुरुमहोदयांनी केले.

२. Quality Indicator Framework (QIF): A Pilot Study ची माहिती भरुन नॅक, बेंगलोर यांना दि. २०/०४/२०१७ रोजी ईमेलद्वारे पाठविण्यात आली आहे.

३. SPD-RUSA Maharashtra यांना विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील पूर्ण वेळ विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य व शिक्षकांची माहिती SPD-RUSA यांनी दिलेल्या Format मध्ये भरुन देण्याबाबत पत्राद्वारे व ईमेलद्वारे सर्व विद्यापीठ संकुल व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

४. SPD-RUSA, Maharashtra यांना "Center for Advanced Research and Training in Geoinformatics" (CART-G) चे Proposal दि. २९/०६/२०१७ रोजी पाठविण्यात आले.

५. विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा दुसरा AQAR रिपोर्ट तयार करण्याबाबत चर्चा करण्यासाठी दि. १२/०७/२०१७ रोजी प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील, अतिरिक्त कार्यभार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात Criterion चे अध्यक्ष, समन्वयक तसेच IQAC-Director, NAAC, Coordinator व IQAC] Secretary यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

➢ **परीक्षा विभाग:**

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार माहे ऑक्टो/नोव्हें २०१६ व मार्च/एप्रिल २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाचे विषयनिहाय परीक्षांचे अंदाजित (Tentative) वेळापत्रक तयार करण्यात आले असून विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) विद्यापीठाचा विशेष दीक्षांत समारंभ दि. २६/०४/२०१७ रोजी यशस्वीरित्या पार पाडला. सदर समारंभात मा. चे. विद्यासागर राव, राज्यपाल तथा कुलपती यांच्या हस्ते मा. श्री.

सुशीलकुमारजी शिंदे, माजी केंद्रीय गृहमंत्री यांना डी. लिट् पदवी प्रदान करण्यात आली आहे.

३) पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश परीक्षा दि. ०५/०६/२०१७ रोजी सुरु होवून त्या यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहेत.

४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार Question Bank तयार करण्याबाबत सर्व विद्याशाखेच्या प्र. अधिष्ठाता यांची समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीची पहिली बैठक दि. ०१/०६/२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती.

५) मार्च/एप्रिल २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या सत्रनिहाय परीक्षेमधील परीक्षा गैरप्रकारात आढळलेल्या विद्यार्थ्यांवर व शिक्षकांवर कार्यवाही करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली.

६) मार्च/एप्रिल २०१७ पासून BBA, BCA, DBM, PGDCA, LLB, LLM, MA, M.Sc., MCA, MSW व M.Com. या अभ्यासक्रमांच्याही सर्व प्रश्नपत्रिका ऑनलाईन वितरण प्रणालीद्वारे (DEPDS) यशस्वीरित्या वितरित करण्यात आल्या.

७) माहे ऑक्टो/नाव्हे २०१७ मध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदन पत्र स्वीकारण्याचे वेळापत्रक तयार करण्यात आले असून विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

८) मार्च/एप्रिल २०१७ मधील सर्व अभ्यासक्रमाचे परीक्षांचे निकाल विहित वेळेत जाहिर करण्यात आले आहे.

९) विद्यापीठाचा १३ वा दीक्षांत समारंभाकरिता देण्यात येणाऱ्या पदवी प्रदान करण्याकरिता ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली असून अर्ज सादर करण्याची तारीख दि. १४/०८/२०१७ पर्यंत असून अर्जाची हार्डकॉपी सादर करण्याची मुदत दि. १८/०८/२०१७ पर्यंत आहे.

१०) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता बी.ए., एम.ए., बी.कॉम., एम.कॉम. बहिस्थ अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया दि. २५/०७/२१७ पासून जिल्ह्यातील निश्चित केलेल्या बहिस्थ परीक्षा केंद्रावर सुरु करण्यात आली आहे.

११) दि. ०८/०६/२०१७ ते २५/०७/२०१७ या कालावधीत पीएच.डी. १८ व एम.फील ५ विद्यार्थ्यांना Declaration of Result देण्यात आले.

१२) एम.फील., पीएच.डी. कोर्स वर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पाडल्या असून तपासणीचे कामकाज सुरु आहे.

१३) मार्च/एप्रिल २०१७ मधील जाहीर करण्यात आलेल्या निकालाचे लेजर व गुणपत्रिका सर्व संबंधित महाविद्यालयास वितरीत करण्यात आले आहे.

१४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील ४८ (३) च्या तरतुदीनुसार बहूतांश अभ्यासक्रमाचे पॅनल तयार करण्यात आले असून पेपर सेटिंगचे कामकाज सुरु आहे.

१५) बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस्सी. (ईसीएस) या अभ्यासक्रमाच्या फेर प्रवेश परीक्षा सुरळीतपणे पार पाडल्या आहेत.

१६) मार्च/एप्रिल २०१७ परीक्षा हंगामातील उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती व पुनर्मूल्यांकनासाठी प्राप्त झालेल्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात येत असून उत्तरपत्रिका छायांकित प्रती तयार झाल्याचे व पुनर्मूल्यांकनाचे निकाल विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्याचे काम सुरु आहे.

➢ **वित्त व लेखा विभाग:**

१) वित्त व लेखा विभागाकडील अधिकारी व कर्मचारीवर्गांना नवीन विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार वित्त व लेखा विभागाकडील लेखे Tally या संगणकीय प्रणालीमध्ये द्विनोंदणी पध्दतीने ठेवण्याकरिता तीन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले.

२) विद्यापीठातील कर्मचारी यांचे नॉन-प्लॅन मधील थकीत रक्कम शासनाकडे वेळोवेळी अंदाजपत्रकामध्ये मागणी करण्यात आली असून पाठपुरावा केल्यानंतर नॉन-प्लॅनमधील सर्व थकीत रक्कम ₹. ३०,६२,७४०/- प्राप्त झाले आहे.

३) नवीन विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार वित्त व लेखा विभागाकडील लेखे Tally या संगणकीय प्रणालीमध्ये द्विनोंदणी पध्दतीने ठेवण्यात येत आहे.

४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आलेले असून लेखापरिक्षीत वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल दि. १८/०७/२०१७ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत ठेवण्यात येत आहे.

५) विद्यापीठातील कर्मचारी यांचे नॉन-प्लॅन व प्लॅन वेतन अनुदानाची रक्कम सहसंचालक कार्यालय, सोलापूर व संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडे मागणी करण्यात आला. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून माहे मार्च २०१७ ते ऑक्टोबर २०१७ अखेर नॉन-प्लॅन करिता वेतन अनुदान बी.डी.एस. वर उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे नॉन प्लॅन व प्लॅन मधील वेतनाची रक्कम नियमित प्राप्त होत आहे.

➢ **ज्ञानस्रोत केंद्र:**

१) सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रासाठी RUSA-II$^{nd}$ Phase अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून EZ Proxy Remote Accessing हे Software खरेदी करण्यासाठीच्या विषय मागील व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आलेला आहे.

२) सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्राचे संगणकीकरण (Digitization) करण्यासाठी RUSA-II$^{nd}$ Phase अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून १. Fed Gate २. D Space ३. RFID System for Library/KRC Book ४. Digitization of Library/KRC Resources Digitization of Existing Resources/Automation इत्यादी संगणक प्रणाली खरेदी करण्याचा विषय मागील व्यवस्थापन परिषदे समोर ठेवण्यात आलेला आहे.

३) RUSA-II$^{nd}$ Phase मधून मिळणाऱ्या अनुदानातून विविध संकुलाकडून अभ्यासक्रमास उपयुक्त असलेल्या पुस्तकांची खरेदी करण्याकरिता पुस्ताकांच्या याद्या मागविण्यात येत आहेत.

४) विद्यापीठाकडील विविध संकुलात पदव्युत्तर वर्गास नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ओळखपत्रे (Smart Card) देण्यात येत आहेत.

➢ **संकुले:**

१) संकुलाकडे प्रा. एस. एच. बेहरे यांना दि. २१/०३/२०१७ ते २५/०३/२०१७ रोजी पाहुणे अधिव्याख्याता (Eminent Professor) म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

२) संकुलामध्ये दि. २५/०३/२०१७ रोजी दु. १२.०० ते २.०० वा. पालकसभा व दु. २.०० ते६.०० वा. Alumini साठी असे चर्चासत्राचे आयोजन केले होते.

३) प्रा. व्ही. बी. पाटील यांच्या एका विद्यार्थ्यांस पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

४) डॉ. एल.पी. देशमुख यांना विश्वविद्यालय अनुदान आयोग यांच्याकडून दिली जाणारी मानाची UGC-BSR Faculty Fellowship मिळाली आहे.

५) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठामधील विद्यार्थी आणि शिक्षकवृंदामध्ये संशोधन व वृध्दी होवून उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकरिता करावयाचा सामजंस्य अंतिम करार कार्यरत करण्यासाठी दि. ३१/०७/२०१७ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

६) जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई येथे दि. ३०/०३/२०१७ रोजी रुसामार्फत आयोजित "Value added course on Geographic Information System (GIS)" या विषयावरील सभेस प्रा.पी. प्रभाकर उपस्थित होते.

७) NEERI, नागपूर येथे दि. ११ व १२ एप्रिल २०१७ रोजी आयोजित होणाऱ्या "International Solid Waste Management Practices in Developing Countries" साठी सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.पी. धुळप यांनी पेपर सादर केले आहे.

८) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक श्री. एस.पी. बावीस्कर हे CBSE- JEE परीक्षेकरिता निरिक्षक म्हणून पुणे येथे दि. ०२ एप्रिल २०१७ रोजी उपस्थित होते.

९) प्रा. पी. प्रभाकर, संचालक भूशास्त्र संकुल यांनी दि. ०६ एप्रिल २०१७ पासून प्र.कुलसचिव म्हणून सोलापूर विद्यापीठाचे अतिरिक्त कार्यभार स्विकारले आहे.

१०) विद्यापीठाकडील मार्च/एप्रिल परीक्षा २०१७ साठी संकुलाकडील प्रा. पी. प्रभाकर यांनी भूमाहितीशास्त्र विषयाचे चेअरमन म्हणून काम पाहिले. याचबरोबर सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी.डी. कुलकर्णी यांनी भूशास्त्र आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.पी. धुळप यांनी पर्यावरणशास्त्र विषयांच्या परीक्षांकरिता चेअरमन म्हणून काम पाहिले.

११) मार्च/एप्रिल परीक्षा २०१७ चे निकाल नेहमीप्रमाणे अगदी कमी कालावधीत लावण्यात आले.

१२) नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथे बहि:स्थ पर्यवेक्षक म्हणून संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक श्री. एस.पी. बावीस्कर दि. १० एप्रिल २०१७ रोजी उपस्थित होते.

१३) राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI), नागपूर येथे आयोजित "Integrated Solid Waste Management Practices in Developing Countries" या विषयावरिल राष्ट्रीय परिषदेकरिता संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ.व्ही.पी. धुळप यांनी दि. ११ व १२ एप्रिल २०१७ रोजी उपस्थित राहून "Waste Management & It's Environmental implications: Case study of Mohol city, Solapur District, (Maharashtra), India" या विषयावर पेपर सादर केले.

१४) जी. पी. पोरवाल महाविद्यालय, सिंदगी (कर्नाटक) येथे आयोजित "Building Research and Innovative Capabilities for Global Competitiveness" या विषयावरिल एकसदिवसीय आंतराष्ट्रीय परिसंवादसाठी संकुलाकडील सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. एस. गवळी, सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.पी. धुळप, डॉ. डी.डी. कुलकर्णी, श्री. एस. पी. बावीस्कर यांनी दि. १५ एप्रिल, २०१७ रोजी उपस्थित राहून पेपर सादर केले.

१५) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी.डी. कुलकर्णी बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून गोपाल कृष्ण गोखले महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. २५ एप्रिल २०१७ रोजी प्रात्यक्षिक परीक्षेकरिता उपस्थित होते.

१६) सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी.डी. कुलकर्णी यांचे "Use of Remote Sensing and GIS for the study of Geomorphic Evolution of Shastri River Basin, Ratnagiri District, Maharashtra" या विषयावरिल प्रकाशनाचा स्वीकार International Journal of Geomatica and Geoscience या करिता केला आहे.

१७) वैद्यकिय सामाईक प्रवेश परीक्षा NEET (The National Eligibility cum Entrance Test) करिता संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.पी. धुळप आणि श्री. एस.पी. बावीस्कर पुणे येथील केंद्रात निरिक्षक म्हणून दि. ०६ व ०७ मे २०१७ रोजी उपस्थित होते.

१८) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.पी. धुळप हे बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून सेवादल महिला महाविद्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे दि. १० मे २०१७ रोजी उपस्थित होते.

१९) संकुलाकडील सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. एस. गवळी नागपूर येथील के.एम.एम. महाविद्यालय येथे बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून दि. १८ मे २०१७ रोजी उपस्थित होते.

२०) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक श्री. उन्हाळे पी. एल. आणि डॉ. पवार आर. एस. हे "Open Source GIS" या विषयावरील दोन आठवडयाच्या कोर्सकरिता NRSC-ISRO, हैद्राबाद येथे उपस्थित होते.

२१) जागतिक जैवविविधता दिनानिमित्त वन विभाग सोलापूर यांच्यामार्फत आयोजित कार्यशाळेत दि.२२ मे २०१७ रोजी उपस्थित राहून संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक

डॉ. व्ही. पी. धुळप यांनी “जैवविविधता, पर्यावरण आणि शाश्वत पर्यटन” या विषयावर मार्गदर्शन केले.

२२) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ.व्ही.पी. धुळप यांना वन विभाग सोलापूर यांचेकडून “महाराष्ट्र हरित सेना” सदस्यत्वाचे प्रमाणपत्र दि. २३ मे २०१७ रोजी प्रदान करण्यात आले.

२३) भूशास्त्र संकुलातील डॉ. आर. एस. गवळी (समन्वयक, ISRO-EDUSAT) यांच्या मार्गदर्शनाखाली ISRO-EDUSAT १९ व्या अभ्यासक्रमासाठी पेपर ०२ साठी दि. २४ मे, २०१७ रोजी परीक्षा घेण्यात आले. सदरील परीक्षेस ३९ विद्यार्थी उपस्थित होते.

२४) लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा येथे दि. २५ मे २०१७ रोजी पर्यावरणशास्त्र विषयाकरिता सहाय्यक प्राध्यापक पदाच्या भरती करिता मा. कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशित केलेले विषय तज्ञ म्हणून संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.पी. धुळप हे मुलाखत घेण्याकरिता उपस्थित होते.

